# अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची तपासणी सूची

प्रशासकीय विभागांनी अनुकंपा नियुक्ती बाबतचे शासन निर्णय/परिपत्रके याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असून विशिष्ट मुद्याबाबत कार्यवाही करतांना अडचणी आल्यास त्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडून मागदर्शन मागविणे अपेक्षित आहे. हे विचारात घेऊन अुकंपा नियुक्तीबाबतची प्रकरणे सामान्य प्रशासन विभागास संदर्भीत करतांना पुढील प्रमाणे निकष विहीत करण्यात यावेत. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे मुद्यांची माहिती प्रकरणासोबत पाठवावी व संबधित टिप्पणीत त्यांचा समावेश करावा.

1) मृत्यू पावलेल्या शासकीय कर्मचा-याचा मृत्यूचा दिनांक .
2) मृत शासकीय कर्मचा-याने धारण केलेले पद, पदाचा गट व कार्यालयाचे नांव.
3) अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवाराचे नांव व त्याने सादर केलेल्या अर्जाचा दिनांक व त्याची प्रत.
4) अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या अर्जदाराची शैक्षणीक अर्हता प्रमाणत्रांच्य प्रतीसह.
5) अनुकंपा नियुक्तीसाठी अर्जदाराने विहित मुदतीत अर्ज सादर केला आहे काय ? नसल्यास, विलंबाने अर्ज सादर करण्याची कारणे काय ?